# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

Light of Life Trust

अंक २८ वा | जानेवारी २०२५

## आमचे ध्येय

**गरिबीचे दुष्टचक्र तोडणे, एकावेळी एक जीवन.**

आम्ही गेल्या १९ हून अधिक वर्षांपासून भारताच्या ग्रामीण भागातील एकुण ६,२६,३१२ लोकांना लाभान्वित केले आहे. आमच्या 'आनंदो' आणि 'जागृती' या कार्यक्रमांच्या माध्यमातून आमचे कार्यक्षेत्र शिक्षण, समुदाय व कौशल्य विकास, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धन या बाबींपर्यंत विस्तारलेले आहे.

## आमचे विश्वस्त मंडळ


- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. आश्दीन डॉक्टर** – विश्वस्त





## २०२५ सालच्या टाटा मुंबई मॅरथॉनमधे लाईट ऑफ लाईट ट्रस्टच्या संस्थापिका आणि व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर यांना 'चेंज लेजंड' म्हणजेच 'बदलांच्या शिल्पकार' हा बहुमान देण्यात आला. त्याचबरोबर लाईट ऑफ लाईट ट्रस्टला डायमंड लेवल प्रतिष्ठाही प्राप्त झाली







## लाईट ऑफ लाईफच्या लाईव्ह कॉन्सर्टमधे जावेद अली व दिशा मुड्डा यांसोबत 'आनंत'च्या विदयार्थ्यांनीदेखील सादरीकरण केले

लाईट ऑफ लाईट ट्रस्टने निधी संकलनाकरिता आयोजलेल्या लाईव्ह कॉन्सर्टकरिता जावेद अली प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. त्यांसोबत दिशा मुड्डाही उपस्थित होत्या. खचाखच भरलेल्या सभागृहात गायक जावेद अली या जागतिक कीर्तीच्या अष्टपैलू गायकाने आपल्या गायनकलेने सलग अडीज तास प्रेक्षकांचे मनोरंजन केले. तसेच उदयोन्मुख गायिका दिशा मुड्डा हिनेदेखील काही गाणी सादर केली. या कॉन्सर्टमधे 'अनंत'च्या विद्यार्थ्यांनीदेखील आपल्या कौशल्याचे उत्कृष्टरित्या सादरीकरण केले. यावेळी प्रेक्षकांचे मनोरंजन तर झालेच शिवाय त्यांनी या भव्य सोहळ्याचे कौतुकही केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जमा झालेला निधी आमच्या आगामी 'आंगन' कार्यक्रमाकरिता वापरला जाणार आहे. प्रसारमाध्यमांमधील आमचे भागीदार व देणगीदार यांचे आम्ही सदैव आभारी आहोत.

ही लाईव्ह कॉन्सर्ट मुंबईतील एन.सी.पी.ए. येथील जमशेद भाभा सभागृह येथे १८ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडली. अनंत कार्यक्रमाच्या प्रशिक्षणातून तयार झालेल्या प्रतिभावान १० विद्यार्थ्यांनी सुंदर सादरीकरण करून कार्यक्रमाची दिमाखदार सुरूवात केली. फ्लॉवरींग ट्री इनकॉरपोरेशन या अमेरिकेतील संस्थेसोबत चालणाऱ्या अनंत कार्यक्रमात या विद्यार्थ्यांनी अनेक वर्षे प्रशिक्षण घेतलेले आहे. आपले कसब दाखवायची संधी या विद्यार्थ्यांना ह्या वार्षिक निधी संकलनाच्या कार्यक्रमाद्वारे मिळाली.







SUPPORTING PARTNERS — EVENT PARTNER — MEDIA PARTNER — RADIO PARTNER

## कु.रुपाली मनवर – एक उदयोन्मुख तारा



वाशीम जिल्ह्यातील मंगुळपीर केंद्रातील कु.रुपाली मनवर या विद्यार्थीनीचा प्रेरणादायी प्रवास सर्वांसमोर मांडताना लाईट ऑफ लाईफला खूप आनंद होत आहे. रुपालीला नुकतीच अकोल्यातील सरकारी वैद्यकीय रुग्णालयात परिचारिकेची रु.७०,०००/- मासिक पगाराची नोकरी मिळाली आहे. दृढनिश्चय आणि आनंदीवृत्ती यांमुळे तिला हे यश मिळवता आले. एकल पालक असल्यामुळे तिला आयुष्यात अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. कुटुंबात तिची आई व दोन लहान भाऊ आहेत. त्यापैकी एका भावाचे शिक्षण अजून पूर्ण व्हायचे आहे. तिची आई कुटंबाला हातभार लावण्यासाठी सतत कष्ट करत असते. विपरित परिस्थिती असूनही रुपालीने आपल्या शिक्षणावर आणि करिअरवर संपूर्ण निर्धाराने लक्ष केंद्रित केले.

रुपाली अभ्यासात अतिशय हुशार होती. तिने १० वी ला ८८% आणि १२ वी ला ७५% गुण मिळवले. त्यानंतर लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मार्गदर्शनाखाली तिने जनरल नर्सिंग ॲण्ड मीड वाईफरी (जी.एन.एम.) या क्षेत्रात करिअर करायचे ठरवले. आपले हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर रुपालीने ३ वर्षे खासगी रुग्णालयात तसेच कंत्राटी तत्त्वावर शासकीय रुग्णालयात नोकरी केली. त्यातून तिने आपल्या क्षेत्रातल्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला व स्वत:ची कौशल्ये आणखी सुधारली. पॅरामेडिकलच्या थेट नोकरी नियुक्तीच्या माध्यमातून तिला ही नोकरी मिळाली आहे.

## ची. विकी कवाणकर – भारतीय सैन्यदलात दाखल



अलिबाग जिल्ह्यातील आनंदो प्लस कार्यक्रमाचा विद्यार्थी कु.विकी विघ्नेश कवाणकर याने भारतीय सैन्यदलात प्रवेश मिळवण्याचे आपले स्वप्न साकार केले. त्याच्या अख्ख्या गावासाठी तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसाठीही ही एक अभिमानाची बाब आहे. विकी हा काजूवाडी या एका छोट्याशा गावातील मुलगा आहे. तो लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या बोर्ली केंद्रातील विद्यार्थी होता. जूनमधे आपले सैन्यदलातील प्रशिक्षण पूर्ण करून तो मोठ्या अभिमानाने घरी परतला. त्याचा प्रवास हा सर्वांसाठीच एक आदर्श आहे.

एकल पालकत्व लाभल्यामुळे विकीला अनेक वैयक्तिक आव्हानांना सामोरे जावे लागले. तरीही तो आपल्या ध्येयाशी एकनिष्ठ राहीला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आधाराने व मार्गदर्शनाने विकीने आपल्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवले.

एक भव्य स्वागतसोहळा आयोजित करून त्याच्या गावाने हे यश साजरे केले. विकीचे अभिनंदन करण्यासाठी त्याचे वर्गमित्र व लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची टीम असे सर्वजण सहभागी झाले. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने सातत्याने दिलेला आधार आणि मार्गदर्शन यांबद्दल विकीने कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या यशात लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने खूप महत्त्वाची भूमिका बजावली याची त्याला जाणीव आहे. १५ दिवसांच्या सुट्टीनंतर त्याला जम्मू आणि काश्मीर मधील उरी येथे भारतीय सैन्यदलाच्या सेवेत रुजू व्हावे लागणार आहे.

## ची. विशाल तायडे – ज्या नोकरीची इच्छा होती ती नोकरी मिळवलीच



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वाशीम जिल्ह्यातील किन्हीराजा केंद्रातील विद्यार्थी ची. विशाल तायडे याची महाराष्ट्र बँकेमधे शेतकी अधिकारी या पदावर, रु.९,६०,०००/- वार्षिक पगारावर नियुक्ती झाली.

अनेक आव्हाने आली तरीही विशालने शिक्षणावरून लक्ष विचलित होऊ दिले नाही. शेती हा विषय निवडून त्याने आपले पदवीचे शिक्षण प्रथम श्रेणी मिळवून पूर्ण केले. ही नोकरी म्हणजे त्याच्या निष्ठेचे आणि मेहनतीचे फळ आहे. विशालचे हे यश म्हणजे त्याचा जोश आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मार्गदर्शनाचा परिणाम यांचा भक्कम पुरावाच आहे.

## 'आनंदो'च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे वाशीम येथील यश



महाराष्ट्र राज्याच्या खेळ आणि युवा विभागाच्या सेवा संचालनालयाने पुणे येथे २९ ऑक्टोबर रोजी शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यात वाशीम केंद्रातील आनंदो कार्यक्रमाच्या लाभार्थी विद्यार्थिनींनी १०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या अडथळ्यांच्या शर्यतीत उल्लेखनीय कामगिरी बजावली.

आप्पा स्वामी हायस्कूल या शाळेत इयत्ता १० वीत शिकणाऱ्या शेंदुरजना केंद्रातील कु.भाविका दिनेश भांडारकरने धावण्याच्या अडथळ्यांच्या शर्यतीत दुसरा क्रमांक पटकावला. त्यामुळे ती आता राज्य स्तरीय स्पर्धेमधे भाग घेण्यास पात्र ठरली आहे.

इयत्ता ८ वीत शिकणाऱ्या कु.सचिन सुनिल भंडारे याने कॅरम या खेळात पराक्रम गाजवला आणि राज्य स्तरीय स्पर्धेमधे मानाचे स्थान पटाकवले.

## 'आनंदो'च्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय पातळीवर अव्वल क्रमांक पटकावला




वाशीम जिल्ह्यातील शेंदुरजना केंद्रावरील कु.ऋषीकेश आढाव हा 'आनंदो' कार्यक्रमाचा विद्यार्थी आहे. त्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या डिझेल मेकॅनिक डिप्लोमा या अभ्यासक्रमात संपूर्ण भारतात अव्वल स्थान मिळवले. त्याच्या या यशाची दखल दिल्लीत राज्याच्या कौशल्यविकास व उद्योजकता विभागाच्या मंत्र्यानेदेखील घेतली. ऋषीकेशची मेहनत व समर्पण यांमुळे त्याला हे यश मिळवणे शक्य झाले.



## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जतमधील कडाव येथील संगणक प्रशिक्षण केंद्राने सर्वोच्च सन्मान मिळवला




आपल्या उल्लेखनीय कामगिरीकरिता लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कडाव येथील संगणक प्रशिक्षण केंद्राला महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या (एम.के.सी.एल.) वार्षिक सभेत दखल घेण्यात आली. राज्यभरातल्या एकुण ५०० केंद्रांपैकी ज्या १५ केंद्रांची निवड करून त्यांना सन्मानीत करण्यात आले होते त्यांमधे कडाव केंद्राचाही समावेश होता.

कडाव केंद्राद्वारे राबवले जाणारे प्रशिक्षणाचे विशेष कार्यक्रम, विद्यार्थ्यांना पुरेपूरपणे सहभागी करुन घेणारे या केंद्राचे उपक्रम आणि विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत हे केंद्र करत असलेले प्रभावी काम यासर्वांकरिता महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एम. के. सी. एल.) ने या केंद्राचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना संगणकाची महत्त्वाची कौशल्ये शिकवण्यासाठी हे केंद्र समर्पित असल्याचेच यातून प्रतीत होते.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जतमधील कडाव येथील संगणक प्रशिक्षण केंद्राने सर्वोच्च सन्मान मिळवला



१ डिसेंबर २०२४ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जत केंद्रातील ४२० विद्यार्थ्यांसाठी **'छोटी सी आशा'** या संस्थेने एक आगळावेगळा असा अनुभव उपलब्ध करून दिला. 'वीश गिफ्ट डिस्ट्रीब्युशन' कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक मुलाच्या मनातली इच्छा पूर्ण केली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ह्या संस्थेने मुलांना अतिशय दिला. त्याचबरोबर मुलांमधे आनंदाची व कृतज्ञतेची भावनाही निर्माण केली.

छोटीसी आशा या संस्थेकडून मुलांना सायकली, गिटार, तबल्याचे संच, शिवणकामाची यंत्रे अशा वेगवेगळ्या प्रकारच्या भेटवस्तू मिळाल्या. त्यांचा उपयोग करून आता ते आपली आवड जोपासू शकतात, स्वप्ने पूर्ण करू शकतात. या कार्यक्रमाशी शान वाढवण्यासाठी 'अनंत'च्या विद्यार्थ्यांनी छोटी सी आशा या संस्थेकरिता व संस्थेतील सदस्यांकरिता एका सुंदर नृत्याचे सादरीकरण केले.





## ब्लॅक ऍण्ड वेच प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून शाळेला पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक साहित्य पुरवण्यात आले



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमासोबत ब्लॅक ऍण्ड वेच प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची भागीदारी आहे. त्याचाच भाग म्हणून या कंपनीने शाळेला पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक साहित्य दिले. २१ डिसेंबर २०२४ रोजी रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मोठीजुई येथील प्रभाकर नारायण पाटील या शाळेला हे साहित्य पुरवण्यात आले. शाळेत नवीन विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, डिजीटल वर्ग आणि सोलर पॅनेल यांची स्थापना केली गेली. त्याचे उद्घाटन ब्लॅक ऍण्ड वेच प्रायव्हेट लिमिटेडकडून करण्यात आले. श्री.अभिजीत तपीसे (सी.एस.आर. समन्वयक, ब्लॅक ऍण्ड वेच प्रायव्हेट लिमिटेड) व श्री.गौतम रामगोपाल (सी.एस.आर. समिती सदस्य, ब्लॅक ऍण्ड वेच प्रायव्हेट लिमिटेड) आणि श्रीमती सारीका राऊत (आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रम समन्वयक इ डअउ, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट) यावेळी उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रयोगशाळेत काही प्रयोग केले. तसेच ग्रंथालय व डिजीटल वर्गाची सैरही केली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि ब्लॅक ऍण्ड वेच प्रायव्हेट लिमिटेड यांनी उदार मनाने केलेल्या या मदतीकरिता शाळा प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या श्री.रमाकांत पाटील (शाळेचे विश्वस्त), श्री.किशोर भोईर (मुख्याध्यापक) व श्री.पाटील सर (शिक्षक) यांनी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली. या सर्व गोष्टींचा शाळा व विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम घडेल व विद्यार्थी आपल्या क्षमतांना व्यवस्थित विकसित करण्याकरिता सक्षम बनतील ह्यावर त्यांनी भर दिला.

## आनंदो शाळा सक्षमीकरणाच्या कुकरमुंडा केंद्रातील विद्यार्थी करिअर मार्गदर्शनाच्या मदतीने आपले भविष्य घडवत आहेत



गुजरातमधील कुकरमुंडा येथील आनंदो शाळा सक्षमीकरणाच्या केंद्राने विद्यार्थ्यांना स्वत:च्या करिअर निवडीच्या अनेक पर्यायांचा शोध घेण्यासाठी सक्षम बनवले. मेंटोरिया समुहाच्या सहकार्याने सर्वसमावेशक अशी समुपदेशन सत्रे घेण्यात आली.

श्री सरस्वती विद्यालय, सेठ एस.के. कपाडिया विद्यालय या दोघांच्या मिळून एकुण ३४७ विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील महत्त्वाकांक्षांविषयी व्यक्तिगत मार्गदर्शन दिले गेले.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळीच्या 'आनंदो' विद्यार्थ्यांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षण



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्रावरील आनंदो कार्यक्रमातील ८ विद्यार्थ्यांना ऑक्टोबर २०२४ मधे एका क्रिकेट प्रशिक्षण शिबिरात सहभागी व्हायची चांगली संधी मिळाली. हे शिबिर रोटरी क्लब ऑफ मुंबई सेंट्रल व त्यांचे समर्पित असे तरुण प्रशिक्षक यांच्या सहयोगाने घेण्यात आले. ऑस्ट्रेलियामधून आलेल्या श्री.प्रणव या उत्साही प्रशिक्षकाने ह्या शिबिराचे नेतृत्व केले. ह्या ४ आठवड्यांच्या मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना खूप मजा आली. श्री.प्रणव यांनी मुलांना महत्त्वाची अशी कौशल्ये दाखवली आणि खेळाविषयीची माहितीही दिली. त्याबरोबर प्रत्येक विद्यार्थ्याला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यातही आले. शिवाय खेळासाठी वापरायचे विशेष बूट घेण्याकरिता विद्यार्थ्यांना रु.७००/– चे भेटवस्तू कूपनही देण्यात आले.

## जागतिक दृष्टीदिनाचा समारंभ – डोळ्यांच्या आरोग्याविषयी जागरुकता निर्माण करणे



११ ऑक्टोबर २०२४ रोजी जागतिक दृष्टी दिन साजरा करण्याकरिता लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जत येथील आरोग्य विभागाने नवीन पनवेल येथील नायर सुपर स्पेशॅलिटी आय हॉस्पिटल सोबत भागीदारी केली. या अंतर्गत 'डोळ्यांचे आजार व काळजी' या विषयासंबंधी जागरुकता निर्माण करणारे एक ऑनलाईन माहितीपर सत्र घेण्यात आले. हे सत्र गुगल मीटच्या माध्यमातून घेतले गेले. डोळ्यांच्या आरोग्याचे महत्त्व व खासकरुन लहान मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्याचे महत्त्व याविषयी जागरुकता निर्माण करणे हे या सत्राचे उद्दिष्ट होते. या सत्राकरिता डॉ.चैताली कुलकर्णी (नेत्रचिकित्सक, नायर सुपर स्पेशॅलिटी आय हॉस्पिटल) आणि श्री.विश्वजीत सुरेश पोनोली (जनसंपर्क अधिकारी, नायर सुपर स्पेशॅलिटी आय हॉस्पिटल) हे दोन तज्ञ वक्ते म्हणून लाभले होते. माणगाववाडी येथील आश्रमशाळेतील तसेच डिक्सळ येथील डॅफोडील इंग्लिश मिडीअम स्कूल यादोघांमधून मिळून एकूण १६७ जणांनी या सत्राला उपस्थिती लावली.

## जागतिक हॅण्डवॉश दिनाचा समारंभ– जिल्ह्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरुकता निर्माण करणे



१७ ऑक्टोबर २०२४ रोजी जागतिक हॅण्डवॉश दिन साजरा करण्यासाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे मुरबाड, तळोदा आणि अकोला तालुक्यातील समुह एकत्र आले. हॅण्डवॉश या जगात सर्वत्र पाळल्या जाणाऱ्या दिनाचा भर, हातांच्या स्वच्छतेच्या महत्त्वाविषयी लोकांमधे जागरुकता निर्माण करणे हा होता. रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये व आरोग्य चांगले रहावे याकरिता हातांची स्वच्छता महत्वाची असते. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमधील विद्यार्थी व समुदायांतील सदस्यांना लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या समुहांनी प्रशिक्षण दिले. त्याअंतर्गत प्रत्येकाचे एक सत्र घेण्यात आले. योग्य पद्धतीने हात कसे धुवायचे ह्याविषयी या सत्रात जागरुकता निर्माण केली गेली. सहभागी शाळांतील मिळून एकुण २६९ विद्यार्थ्यांपर्यंत यासमारंभाद्धारे पोहोचता आले.

## वाशीम जिल्ह्याने जागतिक गणित दिन कौशल्यतेने साजरा केला



२३ डिसेंबर २०२४ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वाशीम जिल्ह्यातील आनंदो कार्यक्रमाच्या ६ केंद्रांनी मिळून जागतिक गणित दिन उत्साहात साजरा केला. शिक्षक व विद्यार्थी यांना या सत्राकरिता व्याख्याते व स्थानिक संस्थांमधील गणित विषयाचे शिक्षक ही मंडळी आदरणीय पाहुणे म्हणून लाभली होती. त्यांनी गणितातील सौंदर्य व गणित विषयाचे महत्त्व सर्वांसमोर मांडले.

विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्याकरिता आणि त्यांना गणित विषयाची गोडी लागावी याकरिता आयोजिलेल्या अनेक रोमांचक उपक्रमांनी तो दिवस व्यापलेला होता. वक्तृत्वकला, गायन, प्रश्नमंजुषा, प्रकल्प बनवणे आणि रांगोळी काढणे अशा अनेकविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य व सृजलशीलता दाखवली. या उपक्रमांमधून त्यांच्या गणितीय विचारांना चालना तर मिळालीच. शिवाय त्यांना तो विषय मजेशीररित्या व नाविन्यपूर्ण पद्धतीने आणखी उलगडून पाहण्याकरिता प्रोत्साहनही मिळाले.

## अकोला जिल्ह्यातील शिवार गावातील रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रम केंद्राचे बाहेरील संस्थेमार्फत मूल्यमापन



रॅलीज इंडिया लिमिटेड यांनी भागीदारी संस्था या नात्याने १३ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४ या दरम्यान अकोला जिल्ह्यातील शिवार गावातील रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रम केंद्राचे सखोल मूल्यमापन केले. २०२१ ते २०२४ या वर्षांच्या दरम्यान या केंद्राने आपल्या कामाच्या माध्यमातून साधलेल्या परिणामाचे मूल्यमापन यावेळी केले गेले. श्री.फैझान तेहसीन यांच्या नेतृत्वाखाली नू-सोशीया या गटाने ही कामगिरी पार पाडली.

२७२ लाभार्थींची सर्वेक्षणे, मुलाखती, घरभेटी आणि कागदपत्रांची पडताळणी यासर्वांचा ह्या मूल्यमापनामधे समावेश होता.

## रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अकोल्यातील शिवार केंद्राचे टाटा अफरमेटिव्ह ऍक्शन प्रोग्रॅम (टी.ए.ए.पी.) मूल्यमापन



२९ नोव्हेंबर २०२४ रोजी रॅलीज इंडिया लिमिटेड यांच्याकडून आलेल्या एका गटाने टाटा अफरमेटिव्ह ऍक्शन प्रोग्रॅम (टी. ए. ए. पी.) याकरिता एक मूल्यमापन केले. कार्यक्रमाची प्रगती व परिणाम यांचे मूल्यामापन करण्याकरिता मूल्यमापनकर्ते श्री.जींरिन तोपानो, श्री.गुरप्रीत सिंग आणि श्रीमती अंशू सिंग (जमशेदपूर) यांनी स्थानिक प्रतिनिधींच्या सोबतीने केंद्राला भेट दिली. या गटाने टाटा अफरमेटिव्ह ऍक्शन प्रोग्रॅम (टी.ए.ए.पी.) यामधे प्रवेश मिळालेल्या लाभार्थींच्या प्रवेश प्रक्रियेचे पुनरावलोकन केले. तसेच त्यांच्या प्रगतीचा मागोवाही घेतला. त्यांनी लाभार्थींसोबत संवाद साधला. लाभार्थींचे प्रत्यक्ष अनुभव त्यांच्याकडूनच जाणून घेतले. शिवाय लाभार्थींचा संपूर्ण प्रवास नीट समजून घेण्यासाठी या गटाने त्यांच्या घरीदेखील भेटी दिल्या.

## पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील घोटावडे फाटा येथील रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमाच्या केंद्राचे मूल्यमापन




या केंद्राचे मूल्यमापन करण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२४ रोजी टाटा केमिकल्स सोसायटी फॉर रुरल डेव्हलपमेंटच्या प्रतिनिधींनी केंद्राला भेट दिली. रॅलीज इंडिया लिमिटेडमधून श्रीमती जिज्ञासा कुर्लपकर, श्रीमती अश्लेषा घोग्रे व टाटा केमिकल्समधून श्रीमती नेहा त्रिपाठी यांनी हे मूल्यमापन केले. स्थानिक समुदायावर या केंद्राचा नेमका काय परिणाम झाला आहे हे समजून घेण्यावर या मूल्यमापनात भर देण्यात आला. मूल्यमापनकर्त्यांना लाभार्थी तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्याही समुहासोबत संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यामधून त्यांना महत्त्वाची माहिती मिळाली आणि त्यांच्या अनुभवांवर अभिप्रायदेखील मिळाला.

## टाटा बिझनेस असेसमेंट गटाची अकोला जिल्ह्यातील शिवार येथील रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमाच्या केंद्राला भेट



१ ऑक्टोबर २०२४ रोजी अकोला जिल्ह्यातील रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमाच्या केंद्राला टाटा बिझनेस असेसमेंट गटाचा पाहुणचार करण्याची संधी मिळाली. या गटामधे टाटा समुहाच्या वेगवेगळ्या कंपन्यांच्या सन्माननीय प्रमुखांचा समावेश होता. श्री. मंदार जोशी (वरिष्ठ उपाध्यक्ष व ट्रेजरी, टाटा कॅपिटल लिमिटेड), श्री.गौतम गोंडील (सहाय्यक उपाध्यक्ष, टाटा बिझनेस एक्सलन्स समुह), श्री.प्रशांत शुक्ला (विभाग प्रमुख, रॅलीज इंडिया लिमिटेड, अकोला), श्री.ऍन्थोनी (टी.ए.आर.ए. प्रकल्प प्रमुख, अकोला) आणि श्री.उमेश गुजर (मानवी संसाधन व प्रशासक कार्यकारी) या सर्वांचा या गटात समावेश होता. शिवार केंद्राने हाती घेतलेले काम व त्या कामाची प्रगती हे सर्व त्या गटाला दाखवण्याची ही सुवर्णसंधी या केंद्राकडे होती. या गटाने केंद्रावर सध्या चालू असेल्या सर्व कामांचे सर्वसमावेशकपणे मूल्यमापन केले. तसेच केंद्रावरील वेगवेगळ्या अभ्यासक्रमांमधे प्रवेश घेतलेल्या लाभार्थींसोबतही त्यांनी थेट संवाद साधला.

लाभार्थी मोकळेपणाने त्यांचे अनुभव मांडत होते व स्वत:च्या महत्त्वाकांक्षा बोलून दाखवत होते. टाटांच्या या गटाने त्यांना बहुमूल्य अभिप्राय दिला व महत्त्वाचे मार्गदर्शनदेखील केले.

## जिल्हा शिक्षण कार्यालयाच्या देखरेख व तपासणी पथकाची आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाच्या कुकरमुंडा केंद्राच्या कार्यालयाला भेट




९ ऑक्टोबर २०२४ रोजी तापी येथील जिल्हा शिक्षण कार्यालयाच्या देखरेख व तपासणी पथकाने आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाच्या कार्यालयाला भेट दिली. श्री. प्रमोद आर. पटेल (शिक्षण निरीक्षक, तापी) व श्री.पानचंद आर.चौधरी (शिक्षण निरीक्षक, तापी) यांचा त्या पथकात समावेश होता. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टतर्फे दोन्ही शाळांमधे जे उपक्रम सुरू आहेत त्यांची त्यांनी पाहणी केली. त्याचबरोबर त्या सर्वांचा परिणाम नीट समजून घेण्यासाठी या पथकाने कुकरमुंडा येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाच्या समुहासोबतही संवाद साधला.

## होगनस इंडिया यांची कौडगाव येथील आनंदो कार्यक्रमाच्या केंद्राला भेट



२१ नोव्हेंबर २०२४ रोजी अहमदनगरमधील कौडगाव येथील आनंदो कार्यक्रमाच्या केंद्रात व विज्ञानशाळेत दोन खास पाहुणे आले होते. सन्माननीय श्रीमती एमा कॅटेरिना (होगनस, स्वीडन) व श्री.अभिषेक (एच. आर., होगनस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, अहमदनगर) हे ते दोन पाहुणे होते. विद्यार्थी, शिक्षक व लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या समुहासोबत संवाद साधून त्यांना आनंद झाला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा समुदायावर कशाप्रकारे परिणाम झाला आहे हे त्यांना त्यांच्या या भेटीदरम्यान समजून घेता आले. शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्यात बदल घडवून आणण्याच्या संस्थेच्या या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

## रायगड जिल्ह्यातील औद्योगिक केंद्र व एन.एम.डी.सी. इथल्या पाहुण्यांची कर्जत तालुक्यातील तिवरे येथील रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमाच्या केंद्राला भेट



२४ डिसेंबर २०२४ रोजी श्री.दयानंद चतुर (रायगड जिल्हा औद्योगिक केंद्र) यांसह एन.एम.डी.सी. (राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ) मधील श्रीमती मोहिनी भागवत व श्री. प्रभास यांनी ह्या केंद्राला भेट दिली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जागृती प्रकल्पाने हाती घेतलेले काम समजून घेणे हा या भेटीमागचा हेतू होता. समुदाय विकासाचे प्रयत्न अधिक बळकट करण्यासाठी आणि रायगड जिल्ह्यात आणखी चांगला परिणाम साधण्यासाठी या दोन संस्थांमधे अशाप्रकारची ज्ञानाची देवाण-घेवाण व असे सहकार्य असणे गरजेचे आहे.

## प्रेरणादायी भेट : रोटरी क्लब ऑफ मुंबईचे सदस्य श्री.अजय गुप्ता यांची कर्जत तालुक्यातील तिवरे गावातील जागृती प्रकल्पाला भेट




रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास या कार्यक्रमाच्या अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांनी तयार केलेल्या अनेक सुरेख अशा उत्पादनांची अनेक प्रदर्शने लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने आयोजिली होती. ही प्रदर्शने जानेवारी व फेब्रुवारी हे दोन महिने चालली होती. त्यामुळे हे दोन्ही महिने उत्सवाचे वातावरण होते. १० नोव्हेंबर रोजी अमेरिकन क्लब ऑफ इंटरनॅशनल वुमेन यांनी आयोजिलेल्या चॅरिटी मेळाव्यात पहिले प्रदर्शन ठेवले होते. तसेच २२ ऑक्टोबर रोजी एन.एम.आय.एम.एस. येथील एस.बी.एम. येथे एन.जी.ओ. मेला येथेही प्रदर्शन ठेवले होते. डिसेंबर महिना तर उपक्रमांनी भरलेला होता. १७ तारखेला दी कॅथेड्रल ऍण्ड जॉन कोनॉन स्कूल यांनी फनफेअर आयोजिलेली होती. तसेच १३ तारखेला बॉम्बे जिमखाना येथे नाताळ बाजार आणि इंडियन रजिस्ट्री ऑफ शिपींग येथे आय.आर.क्लास फ्ली मार्केट अशा दोन ठिकाणी प्रदर्शने लावण्यात आली होती.

## ऑलकार्गो लॉजिस्टीक कर्मचाऱ्यांचा सहभाग - बदलांच्या दिशेची छोटी पावले



३० नोव्हेंबर २०२४ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या पर्यावरण संवर्धन कार्यक्रमाच्या समुहासोबत ऑलकार्गो लॉजिस्टीकचे कर्मचारी नागेवाडी गावात गेले. तिथे या समुहासोबत त्यांनी २०० हून अधिक रोपांचे वृक्षारोपण केले. डॉ.नीलरतन शेंडे (सी.एस.आर. प्रमुख, ऑलकार्गो लॉजिस्टीक), श्री.नितीन कांबळे (सी.एस.आर. समिती सदस्य, ऑलकार्गो लॉजिस्टीक) व श्री.चंद्रकांत पाटील (सी.एस.आर. समिती सदस्य, ऑलकार्गो लॉजिस्टीक) यांनी या कार्यक्रमात भाग घेतला होता. यावर्षी शेतकऱ्यांना मदत म्हणून व पर्यावरणाला पूरक ठरावे याद्दष्टीने लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व ऑलकार्गो लॉजिस्टीक यांनी भागीदारीने २१ गावांतील मिळून ३३५ शेतकऱ्यांना एकुण १०,०५० फळझाडांच्या रोपांचे वाटप केले.



## कनेक्ट-फॉर हे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसोबत जोडले गेले



१५ ऑक्टोबर रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने आपली अमूल्य भागीदार संस्था कनेक्ट-फॉरच्या व्यवस्थापिका श्रीमती समीना भारमळ यांचे आपल्या मुख्य कार्यालयात स्वागत केले. स्वयंसेवकांना कामाचे योग्यप्रकारे वाटप करून, त्यांच्या क्षमता विकसित करून आणि महत्त्वाच्या सेवांचा विकास साधून कनेक्ट-फॉरने गेल्या पाच वर्षांहून जास्त काळ लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला आपल्या लक्ष्याच्या दिशेने वाटचाल करायला मदत केली आहे. आपल्या भेटी दरम्यान श्रीमती भारमल यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसोबत असलेल्या त्याच्या संस्थेच्या भागीदारीविषयी चर्चा केली. तसेच ही भागीदारी अधिक भक्कम व्हावी याकरिताच्या नव्या संधींचा शोधही त्यांनी घेतला. आपल्याकडील स्वयंसेवकांची संख्या आणखी वाढवण्यासाठी आणि आणखी जास्त समुदायाला लाभान्वित करण्यासाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट भविष्यातही **कनेक्ट-फॉरसोबतचे** आपले काम अशाचप्रकारे सुरू ठेवण्याबाबत उत्सुक आहे.

## संपर्कासाठी पत्ता


### मुख्य कार्यालय :

वन बीकेसी, सी विंग, युनिट नंबर : १५१९, प्लॉट नं. : सी-६६,
जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई),
मुंबई - ४०० ०५१. **संपर्क क्र.**: +९१ २२ ६८३२ ७१२२/+९१ ९८२० ६८९ १३१
ईमेल : connect@lightoflifetrust.org

### शाखा कार्यालये :

**महाराष्ट्र :** • अहिल्यानगर • अकोला • अलिबाग • चंद्रपूर • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • पुणे • उरण • वाशिम • यवतमाळ **गुजरात :** कुकूरमुंडा **मध्य प्रदेश :** • सिवनी **राजस्थान :** • बिजोलिया • बुंदी • सिकर **ओडिशा :** • अंगुल **छत्तीसगड, गोआ, बिहार, झारखंड**

www.lightoflifetrust.org +९१-९८२०२२९४४५

@LightOfLifeTrustIndia @lightoflifetrust @lightoflifetrust_lolt @lightoflifetrst youtube.com/c/lightoflifetrust


## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने झाडखंड व बिहार या नवीन ठिकाणी आपले काम सुरू केले



झारखंड व बिहार येथे शिक्षण, आरोग्य व समुदाय विकास या क्षेत्रांत काम करणाऱ्या नव भारत जागृती केंद्र (एन.बी.जे.के.) या नावजलेल्या स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनीधींचा १२ नोव्हेंबर २०२४ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने पाहुणचार केला. श्री.सतीश गिरीजा (सचिव व संस्थापक, नव भारत जागृती केंद्र) आणि श्री.गिरीजा सतीश (अध्यक्ष व संस्थापक, नव भारत जागृती केंद्र) यांनी श्री.रमेश दासवानी (मुख्य कार्यकारी अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट), श्रीमती कमल दमानिया (मुख्य कार्यवाही अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट) आणि श्रीमती शीला अय्यर (संसाधन एकत्रीकरण प्रमुख, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट) यांची लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुंबईच्या कार्यालयात भेट घेतली. ही भेट म्हणजे एका संभाव्य सहकार्याच्या दिशेने टाकलेले एक उत्साहवर्धक पाऊल ठरली. त्याच्या माध्यमातून लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट नवीन ठिकाणी आपले काम सुरू करू शकेल व तिथे आपला प्रभाव पाडू शकेल.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कामाचा रायपूर येथे विस्तार



आय.टी.एम. विद्यापीठासोबत भागीदारी करून लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट छत्तीसगडमधील रायपूर येथे आपले रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास केंद्र सुरू करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. श्री.गौतम कानोजे (मुख्य व्यवस्थापक, जागृती कार्यक्रम, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट) व श्री. भरत ठोंबरे (वरिष्ठ संशोधन अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट) या दोघांनी २१ नोव्हेंबर २०२४ रोजी रायपूरला भेट दिली. आय.टी.एम. विद्यापीठासोबत सहकार्याच्या संधींबाबत चर्चा करणे व त्याचबरोबर समुदायाच्या गरजांचे मूल्यमापन करणे हा या भेटीमागचा उद्देश होता. भेटीदरम्यान श्रीमती लक्ष्मी मोहन (महासंचालक, आय.टी.एम. विद्यापीठ) व आय.टी.एम. विद्यापीठाचे वरिष्ठ सदस्य या सर्वांनी अनेक महत्त्वाच्या गोष्टी सर्वांसमोर मांडल्या व त्याबरोबर या संभाव्य भागीदारीबाबत उत्साहदेखील दर्शवला.

## सेवा नर्सिंग इन्स्टिट्यूटने लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसोबत भागीदारीच्या संधींचा शोध घेतला



११ नोव्हेंबर २०२४ रोजी वाशींद येथील जुना आग्रा भागातील सेवा नर्सिंग इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ.प्रदीप गायकवाड यांनी जागृती प्रकल्पाला भेट दिली. यावेळी त्यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसोबत भागीदारीची इच्छा दर्शवली. त्यांच्या संस्थेतर्फे मान्यताप्राप्त असे अनेक नर्सिंग व लॅब टेक्निशिअन यांविषयीचे अभ्यासक्रम शिकवले जातात. या भेटीच्या वेळी त्यांनी केंद्राची पाहणी केली. तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मोबाईल मेडिकल युनीट (आरोग्यसेवा-फिरता दवाखाना) या कार्यक्रमाला वैद्यकीय संबंधित अभ्यासक्रमांची जोड देण्याच्या शक्यतेविषयी चर्चा केली. ही संभाव्य भागीदारी आमच्या संस्थेच्या सेवेची व्याप्ती वाढवू शकते. तसेच त्याद्वारे समुदायावर परिणाम घडवून आणू शकते.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने नवीन भागीदारीचा शोध घेतला



१९ नोव्हेंबर २०२४ रोजी पुण्यातील मुळशी तालुक्यातील घोटवडे फाटा येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या समुहाच्या प्रतिनीधींनी रोटरी क्लब ऑफ पुणेचे श्री.नरेंद्र सांघवी व एन.आय.आय.टी फाऊंडेशनच्या श्रीमती सुप्रिया चव्हाण यांची भेट घेतली. या विश्वस्त व्यवस्थेसोबत भागीदारीच्या संधींचा शोध घेणे व तिचे शैक्षणिक अभ्यासक्रम आणखी व्यापक समुदायापर्यंत पोहोचवण्याकरिता त्यांचा प्रसार करणे या बाबींवर या भेटीत भर दिला गेला. रोटरी क्लब व एन.आय.आय.टी फाऊंडेशन यांच्या संपर्कात आल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेशांचा आकडा वाढेल व लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आपल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून आणखी जास्त जणांचे सक्षमीकरण करू शकेल अशी संस्थेला आशा आहे.